# ई - पोलीस पत्रिका

दि.०६/०३/२०२३ अनु.क्र.४५

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

**भाग-१**

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/१९६१/२०२३ अमरावती शहर दिनांक ०६/०३/२०२३**

**-: आदेश :-**

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जीत रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण/ पो. स्टे | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोनि/ वैभव पानसरे | आ. गुन्हे शाखा | अर्जित रजा | दि.१३.०३.२०२३ ते दि.२७.०३.२०२३ पर्यत १५ दिवस | |
| ०२ | पोउपनि/ विश्वजीत सरनाईक | वलगांव | अर्जित रजा | दि.१४.०३.२०२३ ते दि.१८.०३.२०२३ पर्यंत ५ दिवस | |

### प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/प्रशि./ए.खि.यो./१८५०/२०२३ अमरावती शहर दिनांक ०२/०३/२०२३**

**संदर्भ :-** OMVEER Film City , Mumbai (Tel. no. ०२२ २८४९७५५०) यांचे दि. ०२.०३.२०२३ रोजीचे दुरध्वनी संदेश.

**विषय :-** एक खिडकी योजना अंतर्गत चित्रिकरणाची परवानगी देण्याचे प्रशिणाबाबत.

*************

**आदेश**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये OMVEER Film City , Mumbai यांचेकडुन एक खिडकी योजना अंतर्गत चित्रिकरणाची परवानगी देणबाबत ऑनलाईन प्रशिक्षणाचे दि. १०.०३.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजन केले आहे.

सदरचे प्रशिक्षणास या आस्थापनेवरील श्री. काळे, ग्रेड- पोलीस उपनिरीक्षक, विशेष शाखा, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांची निवड करण्यात येत. तरी आपण सदर प्रशिक्षणास नचुकता उपस्थित राहावे.

**भाग-२**

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमी करणे

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/अं.आ./पोना/१३०० सिसोदे/ १४०२/२०२३ अमरावती शहर दिनांक - ०१/०३/२०२३**

## अंतिम आदेश

**संदर्भ क्र. -** १) पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/कादानो/पोना/१३०० सिसोदे/१४९१३/२०२२ अमरावती शहर दिनांक - १६/१२/२०२२

२) पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/वि.वे.आ./पोना/१३०० सिसोदे/१४९१४/२०२२ अमरावती शहर दिनांक - १६/१२/२०२२

**कसुरदाराचे नाव** :- पोना/१३०० निलेंद्र विनायकराव सिसोदे, नेमणुक पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर.

***

तुम्ही पोना/१३०० निलेंद्र विनायकराव सिसोदे, नेमणुक पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक ०२/११/२०२१ ते दिनांक १५/०३/२०२२ पर्यत एकुण १३३ दिवस, अनाधिकृतपणे गैरहजर राहील्याबाबत तुम्हास उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये **देय वार्षीक वेतन वाढ २ (दोन) वर्षाकरीता** (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का करण्यांत येवू नये म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये दिनांक ०२/११/२०२१ ते दिनांक १५/०३/२०२२ पर्यत एकुण १३३ दिवस, अनाधिकृतपणे गैरहजर कालावधी हा विनावेतन करण्यांत आला होता.

तुम्हांस दिनांक २४/०२/२०२३ रोजी तुमचे म्हणणे मांडण्याकरिता मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकिंत कक्षात समक्ष बोलाविण्यांत आले व तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यांत आले असता ते समाधानकारक दिसुन आले नाही. तरी तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असून तुमचा दिनांक ०२/११/२०२१ ते दिनांक १५/०३/२०२२ पर्यत एकुण १३३ दिवस, अनाधिकृतपणे गैरहजर कालावधी हा खालील प्रमाणे मंजूर करण्यांत येत आहे. तसेच तुम्हास **संदर्भ क्र. १ अन्वये देण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस फाईल करण्यांत येत आहे**.

| अ.क्र. | नांव व पदनाम | नेमणूकीचे ठिकाण | थोडक्यात कसूरी | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | पोना/१३०० निलेंद्र विनायकराव सिसोदे, | पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर. | दिनांक ०२/११/२०२१ ते दिनांक १५/०३/२०२२ रोजी पावेतो एकूण १३३ दिवसअनधिकृतपणे गैरहजर | दि. ०२/११/२०२१ ते दि. १२/०२/२०२२ पावेतो | एकूण १०३ दिवस अर्जित रजा |
| | | | | दि.१३/०२/२०२२ ते दि.१५/०३/२०२२ पावेतो | एकूण ३० दिवस परावर्तीत रजा |

**भाग-३**

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१. पोआअश/प्रलि-विचौ/प्र.अ.श्री.शेंडे /1919/2023, अमरावती शहर दिनांक०३.०३.२०२३**

**संदर्भ** :- मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमस/12/ 30(16)/ अमरावती श्री.शेंडे/189/2021, दिनांक 29.11.2022

**विषय** :- **कसुरी अहवाल**
आंतरजिल्हा बदली प्रकरणी खोटी माहिती सादर केल्याचे कसुरीबाबत.
श्री.किशोर शेंडे, प्रशासकीय अधिकारी नेमणुक अमरावती शहर
(तत्का.प्रमुख लिपीक,अमरावती शहर)

---000---

आस्थापना लिपीक श्री.ए.डी.कोठेकर व श्री.किशोर शेंडे,प्रशासकीय अधिकारी (तत्कालीन प्रमुख लिपीक अमरावती शहर ) पोलीस नाईक/1395, संदेश राठोड यांचा आंतरजिल्हा बदलीबाबतचा अर्ज पाठवितांना त्यांचा भरती प्रवर्ग वि.जाअ. असतांना खुला नमुद केल्याने सदर पोलीस नाईक यांना खुले वर्गामध्ये आंतरजिल्हा बदलीवर सामावुन घेण्याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे स्विकृती पत्र प्राप्त झाले. सदरची माहिती चुकीची पाठविल्याने खोटी माहिती सादर केल्याचे कसुरीबाबत परि.क्र. ४४ चे मान्यतेने आस्थापना लिपीक श्री.ए.डी.कोठेकर यांचा कसुरी अहवाल पोलीस अधीक्षक,अमरावती ग्रामीण यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला होता. तसेच श्री.किशोर शेंडे, प्रशासकीय अधिकारी हे त्यावेळी कार्यालय अधीक्षक पदावर कार्यरत असल्याने त्यांचा कसुरी अहवाल मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना सादर करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने मा.अपर पोलीस महासंचालक(प्रशासन) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचे वि.पत्रान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 नियम 6(2) नुसार त्यांना किरकोळ शिक्षा देण्यास तसेच शासन परिपत्रक क्र.वशिअ-1218/प्र.क्र.53/11 दिनांक 5.3.2018 अन्वये त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास पोलीस आयुक्त अमरावती शहर हे सक्षम प्राधिकारी असुन त्यांनी प्रस्तुत प्रकरणी विहीत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी कसुरी अहवाल या कार्यालयास परत करण्यात आला आहे.

प्रशासकीय अधिकारी श्री.किशोर शेंडे, यांनी त्या.कसुरीच्या अनुषंगाने सादर केलेला खुलाशाचे अवलोकन केले असता त्यांचा खुलासा मान्य करण्यात येवुन सदर प्रकरण दप्तरी दाखल **(File)** करण्यात येत आहे.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस